| | |
|---|---|
| CNR No.- MHAM09000398-2014 | दाखल तारीख – ३०.०१.२०१४<br>नोंदणी तारीख – ३०.०१.२०१४<br>निकाल तारीख – १७.०८.२०२६<br>कालावधी – **१२व. ०६म. १८दि.** |

**चांदुर बाजार येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २**
**यांच्या न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी – एम. एम. राऊत)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४९/२०१४** **निशाणी क्र.१२**

**गुन्हा रजिस्टर क्र.** : ३१०९/२०१३
**पोलीस स्टेशन** : **चांदुर बाजार.**

**फिर्यादी** : महाराष्ट्र शासन

**प्रतिनिधीत्व** : श्रीमती आर. एस. श्रीराव, सहाय्यक सरकारी अभियोक्ता

**आरोपी** : **महेंद्र विठ्ठलराव तिडके,**
वय – ३० वर्षे, धंदा – मजूरी,
रा. नया अकोला, वलगाव,
ता.जिल्हा– अमरावती.

**प्रतिनिधीत्व** : श्री व्ही. एच. शिरसाट अभियोक्ता

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १५.०८.२०१३ चे पूर्वी |
| खबर/फिर्याद नोंदणीचा दिनांक | : | २६.१०.२०१३ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | : | १७.०१.२०१४ |
| दोषारोप ठेवण्याचा दिनांक | : | ०६.०३.२०१४ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | : | २१.०७.२०१४ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवण्यात आल्याचा दिनांक | : | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १७.०८.२०२६ |
| शिक्षा ठोठावण्याचा आदेशाचा दिनांक/ जर काही | : | काही नाही |

**आरोपीचा तपशील**

| किती आरोपी | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | सोडल्याचा दिनांक | ठेवलेले आरोप | निर्दोष / दोषी | दिलेली शिक्षा | संपरीक्षा चालू असतांना आरोपींना स्थानबध्द करुन ठेवल्याचा कालावधी –फौ.प्र.सं. चे कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | महेंद्र विठ्ठलराव तिडके | १३.०१.२०१४ | १३.०१.२०१४ | भा. दं.वि. चे कलम २२४ अन्वये. | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. | --- | --- |

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| | | |
|---|---|---|
| १. | सा.क्र.१– मोहन लहानुजी साकोरे | पंच साक्षीदार |
| २. | सा.क्र.२ – वसंत महादेव पापडकर | पंच साक्षीदार |
| ३. | सा.क्रं. ३– उमेश सुरेशराव राठोड | फिर्यादी |

**ब) बचावाचे साक्षीदार** – नाही.

**<u>क) न्यायालयीन साक्षीदार</u>** – नाही.

**<u>अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन निशाणी</u>**

अ) **<u>अभियोग पक्ष निशाणी</u>**– – नाही.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.क्र. ०४/सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीस |
| २. | नि.क्र.०५/सा.क्र.३ | अर्ज |

**<u>ब) बचावपक्ष निशाणी</u>** – काही नाही

**<u>क) न्यायालयातर्फे निशाणी</u>** – काही नाही.

**<u>ड) सामग्री वस्तु :</u>** – काही नाही.

**<u>न्यायनिर्णय</u>**

(घोषित दिनांक १७.०८.२०२६)

प्रस्तुत प्रकरणातील आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २२४ प्रमाणे शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपाखाली प्रकरण चालविण्यात आले आहे.

०२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी पोलीस कॉन्स्टेबल उमेश सुरेशराव राठोड यांनी पोलीस स्टेशन चांदुर बाजार येथे फिर्याद दिली की, अमरावती मध्यमवर्ती कारागृह येथे महेंद्र विठ्ठलराव तिडके यास मा. अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाने भा.द.वि.कलम ३०२ या गुन्ह्याकरिता जन्मठेपीची शिक्षा सुनावली होती व दिनांक १५.०७.२०१३ रोजी महेंद्र विठ्ठलराव तिडके बंदी क्र. ४२०१ यास कारागृह उपमहानिरीक्षक पूर्व विभाग नागपूर यांच्या आदेशान्वये तीस दिवसांच्या अभिवचन रजेवर सोडण्यात आले होते व दिनांक १५.०८.२०१३ रोजी नियत दिनांकास कारागृहात हजर होणे आवश्यक होते. परंतु सदरचा बंदी नियत दिनांक

१५.०८.२०१३ रोजी कारागृहात हजर झाला नाही व अनधिकृतपणे कारागृहात बाहेर वास्तव्य करित आहे. त्यामुळे मंजूर रजेवरुन अनाधिकृतरित्या कारागृहाबाहेर वास्तव्य करण्याचा प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी संदर्भिय परिपत्रकानुसार बंदी रजेच्या कालावधीत ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत रजा कालावधीत राहणार आहे. त्या पोलीस स्टेशनमध्ये बंदयाविरुध्द वरील संदर्भित आदेशान्वये भारतीय दंडसंहिता चे कलम २२४ या कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात यावा व बंदयाचा शोध तात्काळ घेऊन सदर गुन्ह्यात अटक करुन या कारागृहात दाखल करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. अधिक्षक अमरावती मध्यवर्तीय कारागृह यांच्या सदर आदेशावरुन फिर्यादी यांनी बंदी महेंद्र तिडके याच्याविरुध्द भा.द.वि.कलम २२४ खाली फिर्याद दिली.

०३. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन चांदुर बाजार पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे आरोपीविरूध्द गु.र.नं.३१०९/२०१३ अन्वये भा.दं.वि.चे शिक्षापात्र कलम २२४ अन्वये गुन्हा दाखल झाला. तपासी अधिकारी यांनी गुन्ह्याचे तपासकामी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले, घटनास्थळ पंचानामा केला व आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपीविरुध्द **नि.क्र.२** अन्वये भारतीय दंड संहितेच्या शिक्षापात्र कलम २२४ या कलमांखाली दोषारोप निश्चित केला. आरोपीला सदर दोषारोप मराठीमध्ये वाचुन दाखविला आणि समजावुन सांगितला. आरोपीने त्याचे प्रतिकथन देवुन त्यास नकार देत संपरीक्षेला तोंड देण्याची तयारी दर्शविली.

०५. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी एकुण ०३ साक्षीदारांना तपासले व **नि.क्र. १** वर आदेश पारीत करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०६. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अन्वये अभिप्रेत असलेले त्याचे बयाण **नि.क्रं. ११** नोंदविण्यात आले.

०७. प्रस्तुत खटल्यात पुराव्याअंती खालील मुद्दे माझे विचारासाठी उपस्थित झाले आहेत. त्यावर मी कारणमिमांसेसह खालील निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १५.०८.२०१३ रोजी आरोपी हा भा.द.वि कलम ३०२ गुन्ह्यामध्ये जन्मठेपीची शिक्षा भोगत असताना त्याला तीस दिवसांची अभिवचन मंजूर झालेली होती व सदरच्या रजेचा कालावधी संपल्यानंतर आरोपी हा मध्यवर्ती कारागृह अमरावती येथे हजर झाला नाही व त्यामुळे त्याने भा.दं.वि. कलम २२४ प्रमाणे गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली आहे काय ? | **...नाही** |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे. |

## का र ण मी मां सा

**मुद्दे क्र. १ करिता:–**

०८. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्यासाठी आरोपीने जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना मध्यवर्तीय कारागृह अमरावती येथून पलायन केले, ही बाब संशयापलिकडे जाऊन सिध्द करणे आवश्यक आहे.

०९. फिर्यादी– उमेश सुरेशराव राठोड (सा.क्र.१) यांना तपासले असता त्यांनी त्यांच्या साक्षीत कथन केले की, दिनांक ०८.१०.२०१३ रोजी अभिवचन रजेवर असलेला आरोपी महेंद्र विठ्ठलराव तिडके याच्याविरुध्द तो फरार असल्यामुळे पोलीस ठाणे चांदुर

बाजार येथे अधिक्षक अमरावती मध्यवर्तीय कारागृह यांचा अर्ज घेऊन तो त्यांनी पोलीस स्टेशन चांदुर बाजार येथे आणून दिला. सदरचा अर्ज त्यांना दाखवला असता त्यावर अधिक्षक कारागृह अमरावती यांची सही असून त्या अर्जातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे त्याने कथन केले. त्यास नि.क्र.५ देण्यात आला. सदर अर्जासोबत मा. कारागृह उपमहानिरीक्षक पूर्व विभाग यांचे कलम २२४ भा.द.वि प्रमाणे आरोपी महेंद्रविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश साक्षीदाराने अभिलेखावर दाखल केले आहे. सदर आदेशाच्या झेरॉक्स प्रति आहेत व त्या आदेशानुसार आरोपीविरुध्द भा.द.वि कलम २२४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

**१०.** याठिकाणी नि.क्र. ५ वरील जर आदेशाचे अवलोकन केले तर असे दिसून येते की, आरोपी हा भा.द.वि कलम ३०२ गुन्ह्यासाठी जन्मठेपीची शिक्षा भोगत होता व त्याला दिनांक १५.०७.२०१३ रोजी तीस दिवसांची अभिवचनीय शिक्षा मंजूर करण्यात आली होती व रजा संपल्यानंतर दिनांक १५.०८.२०१३ रोजी आरोपीस परत कारागृहात हजर होणे आवश्यक होते. परंतु आरोपी हा दिनांक १५.०८.२०१३ रोजी हजर झाला नसल्याने त्याच्याविरुध्द भा.द.वि. कलम २२४ अंतर्गत कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. याठिकाणी हे नमूद करणे गरजेचे आहे की, भा.द.वि.कलम २२४ अंतर्गत एखाद्या व्यक्तिवर जर गुन्हा दाखल असेल किंवा त्या गुन्ह्यामध्ये त्याला शिक्षा झालेली असेल अशी व्यक्ति जरअजाणीवपूर्वक त्याच्या कायदेशीर अटकेला प्रकिकार करते किंवा अटकेला अडथळा आणते किंवा कायदेशीर अटकेमधून पळून जाते किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करते हे जर सिध्द झाले तर सदरच्या व्यक्तिला भा.द.वि. कलम २२४ अंतर्गत दोषी ठरवून दंडित केले जाऊ शकते. उपरोक्त भा.द.वि.कलम २२४ ची व्याख्या जर प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने विचारत घेतली तर अभियोग पक्षाचेच म्हणणे आहे की, आरोपी हा जन्ठेपीची

शिक्षा भोगत असताना त्याला तीस दिवसांची अभिवचन रजा मंजूर करण्यात आली होती व त्यानुसार त्याला मुक्त करण्यात आले होते. सदरची अभिवचन रजा दिनांक १५.०७.२०१३ रोजी सुरु होऊन दिनांक १५.०८.२०१३ पर्यंत होती व आरोपी हा दिनांक १५.०८.२०१३ पर्यंत कारागृहात हजर झाला नसल्याने, त्याच्याविरुध्द प्रस्तुतचा भा.द.वि. कलम २२४ साली गुन्हा दाखल करण्यात आला.

**११.** याठिकाणी हे नमूद करणे गरजेचे आहे की, अभियोग पक्षाने तोंडी किंवा कागदोपत्री पुराव्याने असे कुठेही सिध्द केले नाही की, आरोपी याने जाणीवपूर्वक त्याच्या अटकेला अडथळा निर्माण केला किंवा तो कायदेशीर अटकेतून पळून गेला. आरोपीला कारागृहामार्फतच अभिवचन रजेवर मुक्त करण्यात आले होते. त्यामुळे आरोपी कारागृहातून पळून गेला असे म्हणता येणार नाही. तसेच फिर्यादी यांनी उलटतपासामध्ये हे मान्य केले आहे की, या गुन्ह्याविषयी त्यांना प्रत्यक्ष काहीही माहिती नाही. तसेच साक्षीदार क्र. २ व २ जे पंच आहेत त्यांनी अभियोग पक्षास कुठलेही सहाय्य केले नसून पंचनाम्यातील मजकूर माहित नसल्याचे कथन केले आहे. तपासी अधिकारी यांनी वारंवार समन्स काढले असता पोलीसांकडून समन्स तामिली अहवाल अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे ज्याअर्थी सदरचे प्रकरण हे दहा वर्षापेक्षा जास्त जुने आहे त्याअर्थी अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. त्यामुळे अभिलेखावर आरोपीविरुध्द कोणताही ठोस पुरावा अभियोग पक्षाने सादर केलेला नाही.

**१२.** एकंदरीत, जो पुरावा अभियोग पक्षामार्फत अभिलेखावर दाखल करण्यात आलेला आहे त्यातून आरोपीने कायदेशीर अटकेतून पलायन केले हे कुठेही सिध्द होत नाही. अशा परिस्थितीत आरोपीविरोधात संयुक्तीक पुरावा अभिलेखावर उपलब्ध नसल्याने

मी, मुद्दा क्रमांक १ चे नकारात्मक उत्तर देवून मुद्दा क्र.२ करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. आरोपी **महेंद्र विठ्ठलराव तिडके,** रा. नया अकोला, ता.जि. अमरावती यांना फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५ (१) प्रमाणे भा.दं.वि. शिक्षापात्र कलम २२४ या कायद्यान्वये अपराध केल्याच्या दोषारोपातून निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात आले.

३. आरोपीने फौ.प्र.सं. चे कलम ४३७–अ प्रमाणे अपील न्यायालयात हजर राहण्याकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा वैयक्तीक मुचलका व जामीन दयावा.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर )

Digitally signed by MANDAR MOHAN RAUT
Date: 2026.08.17 17:45:24 +0530

चांदुरबाजार
दि.१७.०८.२०२६

**(एम. एम. राऊत)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. २
चांदुर बाजार
**जज कोड : एमएच–०३०२२**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | G. D. Patil |
| Court Name | : | J.M.F.C., Chandur Bazar. |
| Judgment signed on | : | 17.08.2026 |
| Judgment Uploaded on | : | 17.08.2026 |